# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

**दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९** **ईमेल: rahuri.amfu@gmail.com**

**११) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०७/०४/२०२०**

**जिल्हा : नंदुरबार**

| मागील आठवड्यातील हवामान (३१/०३/२०२० ते ०६/०४/२०२०) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०८/०४/२०२० ते १२/०४/२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३१ | ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | दिनांक | ०८ | ०९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| | | | | | | | कमाल तापमान (अं.से.) | ३९ | ३९ | ३९ | ४१ | ४२ |
| | | | | | | | किमान तापमान (अं.से.) | २२ | २२ | २२ | २२ | २२ |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | ० | ० | ० | ० | ० |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६२ | ६५ | ५९ | ४५ | ३६ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | २४ | २३ | २३ | १८ | १४ |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ९ | १० | ६ | ६ | ५ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक / अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | पुढील पाच दिवस हवामान कोरडे राहील व तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | उन्हाळी पिकांना वाढीच्या अवस्थेनुसार संरक्षीत पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. |
| संदेश | पिकांमधील बाष्पीभवन कमी होण्यासाठी पालापाचोळ्याचे आच्छादन करावे व ठिबकव्दारे पाणी द्यावे. |
| भुईमुग | शेंगा तयार होत असताना जास्तीत जास्त शेंगा तयार होण्यासाठी ७० ग्रॅम ००:५२:३४ , ५० ग्रॅम मल्टीमायक्रोन्युट्रीएंट/ १५ लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| सुर्यफुल | मावा व तुडतुडे या रस शोषणार्यास किडिंच्या नियंत्रणासाठी १० मिली डायमेथोएट ३०% प्रवाही प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| लसून घास | स्पोडोप्टेरा अळीच्या व्यवस्थापनासाठी १ मिली एस.एल.एन.पी.व्ही. + ५ ग्रॅम बिव्हेरिया बॅसिअना १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| लिंबु वर्गिय पिके | काळी माशीच्या नियंत्रणासाठी १५ ग्रॅम ॲसिफेट ७५% पाण्यात मिसळणारी पावडर प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| डाळिंब | सूत्रकृमींचा प्रादुर्भाव आढळून आसल्यास १३५ किलो कार्बोफ्युरॉन ३ जी प्रति हेक्टरी झाडांभोवती रिंग पद्धतीने पुरेसा ओलावा असताना टाकून झाकावे. |
| चिकु | बी पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी १० मिली प्रोफेनोफॉस ५०% किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ ई.सी. किंवा डेल्टामेथ्रीन २.८ ई.सी. प्रवाही प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| जरबेरा | नाग अळीचे नियंत्रणासाठी १० मिली क्लोरपायरिफॉस २० ई.सी किंवा १५ ग्रॅम ॲसिफेट ७५ एस. पी. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| कार्नेशन | लाल कोळी या किडीच्या नियंत्रणासाठी ४ मिली ॲबेमेक्टीन १.८ ई.सी. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| उन्हाळ्यातील पशुपालन व्यवस्थापन | वातावरणातील उष्णता वाढल्यामुळे जनावरांच्या शरीराचे तापमान वाढते व हे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी जनावरे जास्त पाणी पितात व कमी चारा किंवा खाद्य खातात. याचा एकूणच जनावरांच्या वाढीवर, प्रजननावर व उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होतो. त्यामुळे पुढील नुकसान टाळण्यासाठी उन्हाळ्यात जनावरांची पुढीलप्रमाणे काळजी घ्यावी.<br>१) जनावरांचा गोठा थंड जागी किंवा झाडाखाली बांधावा. गोठ्याच्या छपरावर गवत , पाला, पाचोळा, नारळाच्या झावळ्या टाकून पाणी शिंपडावे त्यामुळे गोठा थंड राहतो.<br>२) उन्हामध्ये जाणारांना ३-४ वेळा थंड व स्वच्छ पाणी पाजावे. गोठ्यात पाण्याची स्वतंत्र सुविधा केलेली असल्यास पाण्याचे भांडे सावलीत असावे व भांडे मुख्यत: माती किंवा सिमेंटपासून बनवलेले असावे जेणेकरून त्यात पाणी दिवसभर थंड राहील.<br>३) जनावरांना उन्हाळयात दुपारच्या वेळी चरावयास पाठवू नये.<br>४) दुपारच्या वेळी जनावरांना हिरवी मका , चवळी, कडवळ, लसूणघास यासारखे पोषण वैरन द्यावी. त्यामुळे दूध उत्पादनात सातत्य टिकून राहते व प्रजनन क्षमताही सुधारते. |

**दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९** **ईमेल: rahuri.amfu@gmail.com**


| | |
|---|---|
| | ५) आहारामध्ये वाढीव क्षार मिश्रणाचा वापर करावा , व 'अ' जीवनसत्वाचा पुरवडा करण्यासाठी जास्तीत जास्त हिरवा चारा द्यावा.<br>६) उन्हाच्या तीव्रतेपासून संरक्षण होण्यासाठी जनावरांना पुरेसा निवारा उपलब्ध करून द्यावा. गोठा हवेशीर असावा, गरम हवा बाहेर जाण्यासाठी व थंड हवा आत येण्यासाठी जागा असावी. |

स्त्रोत :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान :

ठिकाण : मफुकृवि , राहुरी.
दि. : ०७/०४/२०२०

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**